'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई**
संपर्क : मो. ९०११२०१४१४
Email ID : shabdarutu@gmail.com

✼ वर्ष २ रे ✼ अंक ३२ वा ✼ रविवार दि. ११ मे २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ ✼ किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

## विंग कमांडर व्योमिका सिंग भडकल्या

**पुणे :** विंग कमांडर व्योमिका सिंग म्हणाल्या, आमची मोहीम विशेषतः भारतविरोधी कारवायांसाठी वापरल्या जाणाऱ्या दहशतवादी ठिकाणांवर लक्ष केंद्रित होती. भारतीय सशस्त्र दलांनी कोणत्याही धार्मिक स्थळाला लक्ष्य केले नाही कर्नल सोफिया कुरैशी म्हणाल्या, भारतीय सशस्त्र दल पूर्णपणे सज्ज, सतर्क आणि भारताच्या 'सार्वभौमत्व आणि अखंडतेच्या रक्षणासाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे.

# पुन्हा शस्त्रसंधीचे उल्लंघन

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तानमध्ये शनिवारी संध्याकाळी ५ वाजल्यापासून सीजफायर झाला आहे. परराष्ट्र सचिवांनी पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली. शनिवारी दुपारी ३ वाजून १५ मिनिटांनी पाकिस्तानच्या डीजीएमओचा भारताच्या डीजीएमओला फोन आला होता. आता १२ मे रोजी दोन्ही देशाचे डीजीएमओ चर्चा करणार आहेत. एकमेकांवर गोळीबार न करण्यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवल्याचेही परराष्ट्र सचिवांनी सांगितले. दरम्यान रात्री पाकिस्तानने पुन्हा गद्दारी करत युद्धविरामाचे उल्लंघन करत सीमावर्ती भागात गोळीबार केल्याने भारतानेदेखील त्यांना प्रत्युत्तर दिले.



दोन्हीकडून कोणतीही फायरिंग होणार नाही. मिल्ट्री कारवाई होणार नाही. जमीन, हवा आणि सागरी मार्गाने हल्ला होणार नाही. आज संध्याकाळी ५ वाजल्यापासून दोन्ही देशांच्या बाजूने शस्त्रसंधी केली जात आहे. १२ तारखेला पुन्हा एकदा पाकिस्तानशी बोलणं होणार आहे. दरम्यान परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी ट्विट करून या शस्त्रसंधीची माहिती दिली आहे. भारत आणि पाकिस्तानने आज गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याबाबत एक समझोता केला आहे. भारताने दहशतवादाच्या सर्व प्रकारांप्रती आणि स्वरूपांप्रती कायमच कठोर आणि तडजोड न करणारी भूमिका घेतली आहे. ही भूमिका भारत पुढेही कायम ठेवेल, असे जयशंकर यांनी म्हटले आहे. भारताने पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर राबवले होते. भारताने पीओके आणि पाकिस्तानवर एअर स्ट्राईक केला. या एअर स्ट्राईकमध्ये दहशतवाद्याचे अनेक अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले होते, या सर्व पार्श्वभूमीवर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव चांगलाच वाढला होता, अखेर आता युद्धविरामाची घोषणा करण्यात आली आहे.

**दहशतवादी हल्ला युद्धच!**

दहशतवादी हल्ला भारताविरुद्ध युद्ध पुकारल्याचे समजले जाईल असा इशारा भारतान दिला आहे. दहशतवादी हल्ला झाल्यास थेट युद्ध समजून उत्तर दिले जाईल. ही भारताकडून करण्यात आलेली सर्वात मोठी घोषणा आहे. यापूर्वी भारत दहशतवादी आणि पाकच्या लष्कराच्या हल्ला यामध्ये थोडासा फरक मानत होता. आता मात्र भारताने दहशतवाद्यांना ठेचण्यासाठी सर्वात मोठा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानच्या लष्कर पुरस्कृत दहशतवाद्यांनी हल्ला केल्यास ते युद्ध मानून उत्तर देण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे. दहशतावाद्यांचे तळ उद्धवस्त केले मात्र लष्करावर हल्ला केलेला नव्हता. मात्र, यापुढे दहशतवादी हल्ला झाल्यास भारताकडून लष्कर-ए-तोयबा असेल किंवा पाकिस्तानच्या लष्काराला ठोस प्रत्युत्तर दिले जाईल. भारताने दहशतवादी हल्ल्याला युद्धजन्य कृती समजून उत्तर देऊ असे म्हटले आहे.

## 'त्या' टॉप दहशतवाद्यांची नावे समोर

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने मारलेल्या पाकिस्तानी दहशतवाद्यांची नावे उघड झाली आहेत. लष्कराच्या हल्ल्यात ५ मोठे दहशतवादी मारले गेले.

मुदस्सर खादियान खान

लष्कर-ए-तैयबाचा हा दहशतवादी मुरीदकेच्या मरकज तैयबाचा प्रभारी होता. ऑपरेशनच्या रात्री तिथे उपस्थित होता. पाकिस्तानकडून मिळालेल्या गुप्तचर माहितीनुसार, अबू जुंदालच्या अंत्यसंस्कारात पाकिस्तानी सैन्याकडून गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला.

महाफिज मुहम्मद जमील

जैश-ए-मोहम्मदशी संबंधित जमील हा मौलाना मसूद अझहरचा मोठा मेहुणा होता. ज्या दिवशी ऑपरेशन झाले, त्या दिवशी जमील बहावलपूरमधील त्याच्या घरी झोपला होता.

मोहम्मद युसूफ अझहर

हा जैशचा दहशतवादी उस्ताद आणि मोहम्मद सलीम या नावांनीही ओळखला जात असे. तो मसूद अझहरचा मेहुणा होता.


खालिद अबू आकाश

लष्कर-ए-तोयबाचा हा दहशतवादी अफगाणिस्तानातून शस्त्रास्त्रे पुरवत असे. ज्या दिवशी हल्ला झाला त्या दिवशी तो त्याच्या घरात झोपला होता.


मोहम्मद हसन खान

हा जैशचा दहशतवादी पाकव्याप्त काश्मीर मधील जैशए-मोहम्मदचा ऑपरेशनल कमांडर मुफ्ती असगर खान काश्मिरी यांचा मुलगा होता. जम्मू आणि काश्मीरमध्ये हल्ल्यांचे समन्वयक होता.

**नवी कोरी पुस्तकं**




**तुझ्याचसाठी आणि एहसास**
: लेखकाचे नाव :
सुभाष बिडवे
किंमत रु. : ४५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर




**पोरयांपोर**
: लेखकाचे नाव :
डॉ. राजू शनवार
किंमत रु. : ३८०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन,**
श्रीरामपूर

# साडेचारशे एकर जागेत आंतरराष्ट्रीय ज्ञानपीठ

**पुणे :** प्राचीन भागवत धर्मातील सनातन आणि कल्याणकारी विचार जगभरात पोहोचवण्यासाठी आळंदी येथे साडेचारशे एकर जागेत ७०१ कोटी रुपये खर्च करून जगाला हेवा वाटेल असे संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानपीठ उभारण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.



आळंदीत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. ज्ञानपीठाच्या माध्यमातून भारतीय आध्यात्मिक परंपरेतील मानवी कल्याणाचा शाश्वत विचार जगभरात जाईल. इंद्रायणी नदीचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. हा आराखडा सर्व मान्यता घेऊन केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे. लवकरच तो मंजूर करून घेण्यात येईल. याद्वारे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसह ३९ गावांतील पाणी शुद्ध करून इंद्रायणीत जाईल. इंद्रायणी नदीचे जल स्वच्छ, निर्मळ आणि पूजनीय होईल असा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.


शांतिब्रह्म मारुती महाराज कुरेकर यांनी भागवत धर्म प्रचारासाठी केलेले कार्य लक्षात घेता यांना पद्म पुरस्कार मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात येईल, संतांची ही मोठी परंपरा आपल्या देशाला लाभली आहे. जात, पंथ, धर्मविरहित समाज निर्माण करण्याचे कार्य संतांनी केले. वारकरी प्रत्येकात पांडुरंग पाहतो. वारकरी संप्रदायाने रुजवलेल्या परंपरेमुळे राज्य अग्रेसर आहे. भौतिक प्रगतीमुळे शांती मिळत नाही तर मानसिक स्वास्थ्य महत्त्वाचे आहे. संतपरंपरेमुळे, त्यांनी दिलेल्या आध्यात्मिक विचारामुळे समाजाचे मानसिक स्वास्थ्य चांगले आहे. प्रत्येक गावातील भागवत सप्ताहामुळे हा विचार सर्वदूर पोहोचवण्यास मदत होत आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

# २७ मे पर्यंत मान्सून धडकणार

**नवी दिल्ली :** हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, यावेळी मान्सून केरळच्या किनाऱ्यावर वेळेच्या पाच दिवस आधी धडकू शकतो. यावेळी २७ मे रोजी देशभरात मान्सूनच्या आगमनाची अपेक्षा आहे.

साधारणपणे, दरवर्षी १ जून रोजी मान्सून केरळच्या किनाऱ्यावर पोहोचतो. आयएमडीच्या आकडेवारीनुसार, जर अंदाज व्यक्त केल्याप्रमाणे त्याच वेळेत मान्सून केरळमध्ये दाखल झाला, तर २००९ नंतर भारतीय भूमीवर मान्सूनचे हे सर्वात लवकर झालेले आगमन असणार आहे.

या आधी २००९ मध्ये मान्सून २३ मे रोजी केरळमध्ये दाखल झाला होता. साधारणपणे, नैऋत्य मान्सून १ जूनपर्यंत केरळमध्ये दाखल



होतो आणि ८ जुलैपर्यंत संपूर्ण देशभरात दाखल होतो. १७ सप्टेंबरच्या सुमारास तो वायव्य भारतातून माघार घेण्यास सुरुवात करतो आणि १५ ऑक्टोबरपर्यंत परतून जातो.

पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम रविचंद्रन म्हणाले की, जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या मान्सून काळात भारतात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. यावेळी मान्सूनपूर्व हालचालीही मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. गेल्या एका महिन्यापासून देशाच्या मोठ्या भागात जोरदार वारे आणि पावसाळी गतिविधी सुरू आहेत.

## पहलगाम छायाचित्रांची मागणी १२ पट वाढली

**मुंबई :** २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी झाला. हल्ल्याच्या दोन महिने आधी अमेरिकेच्या 'मॅक्सर टेक्नॉलॉजीज' या स्पेस टेक कंपनीला या भागातील उच्च-रिझोल्यूशन उपग्रहीय छायाचित्रांच्या मोठ्या ऑर्डर मिळाल्या. जिथे महिन्यातून एक-दोन ऑर्डर येतात, तिथे फेब्रुवारीमध्ये १२ ऑर्डर मिळाल्या, म्हणजेच १२ पटजास्त.

# पाकिस्तानचे १५० ड्रोन पाडले

**नवी दिल्ली :** शुक्रवारी रात्री पाकिस्तानने भारतातील २६ शहरांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला केला, पण आपल्या हवाई संरक्षण यंत्रणेने ते सर्व हवेत पाडले. राजस्थान, पंजाब आणि गुजरातमध्ये सुमारे १३ ठिकाणी सुमारे १५० ड्रोनने हल्ले केले, परंतु ते सर्व एका क्षणात पाडले. हल्ल्यांमध्येही या भागातील लोक निडरपणे छतावरून दृश्य पाहत राहिले. या शस्त्रांचे सर्वाधिक अवशेष राजस्थानातील बाडमेर येथील परेऊ आणि गेहून गावात आढळले. येथे हवाई संरक्षण यंत्रणेने १२ तासांत ५० ड्रोन पाडले. सकाळी लोकांनी मलबा गोळा केला. पोलिस व हवाई दल येईपर्यंत लोक त्याच्यासोबत खेळत राहिले. येथे रेड अलर्ट होता, त्यामुळे किराणा, दूध आणि भाजीपाल्याची दुकाने दिवसातून फक्त दोन तास उघडली होती. त्याचप्रमाणे, हरियाणातील सिरसा येथे रात्रभर घबराट पसरली होती, कारण पाकने दिल्लीला लक्ष्य करून पाठवलेले फतेह-१ क्षेपणास्त्र येथे हवाई संरक्षण यंत्रणेने पाडले होते. सकाळी लोक बाहेर आले तेव्हा त्यांना शेतात मलबा दिसला. भूजमध्येही ड्रोनचे तुकडे आढळले.

## मुंबईत फटाके उडवण्यावर बंदी

**मुंबई :** पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला होता, या हल्ल्यामध्ये २६ जणांना आपला जीव गमवावा लागला. या सर्व पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी आता मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईत उद्यापासून फटाके आणि रॉकेट उडवण्यावर बंदी घालण्यात आली आहे. सीमेवरील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे. ११ मेपासून ते ९ जूनपर्यंतमुंबईत फटाके फोडण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

# तापी महाकाय पुनर्भरण योजनेच्या करारावर दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची स्वाक्षरी

**मुंबई :** भोपाळ महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील सातपुडा पर्वत रांगेत असलेल्या तापी महाकाय पुनर्भरण योजनेच्या करारावर दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची स्वाक्षरी झाली आहे. या बैठकीला जलसंपदामंत्री गिरीश महाजन उपस्थित होते.

भोपळ येथे मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये जलसंपदा विभागाच्या विविध आंतरराज्यीय प्रकल्पांच्या संदर्भात बैठकीमध्ये विस्तृत चर्चा झाली व प्रकल्प पुढे नेण्याच्या अनुषंगाने सामंजस्य करार देखील करण्यात आले.

सदर बैठकीस गिरीश महाजन, तुलसीराम सिलावट, आ.अर्चना चिटणीस उपस्थित होते. या प्रकल्पामुळे जळगाव जिल्ह्यातील रावेर, यावल, चोपडा, मुक्ताईनगर तसेच अमरावती व अकोला जिल्यातील धारणी, अचलपूर, दर्यापूर, अंजनगाव, सुरजी, तेल्हारा, अकोट, जळगाव जामोद व संग्रामपुर या तालुक्यातील सुमारे २,१३,७०६ हेक्टर एवढ्या क्षेत्रास व मध्यप्रदेश राज्यातील खंडवा व बु-हाणपूर या जिल्ह्यातील खलवा, नेपानगर, खकनार व बुऱ्हाणपूर तालुक्यातील सुमार ९६.०८२ हेक्टर एवढ्या क्षेत्रास अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळणार आहे. अशाप्रकारे या प्रकल्पामुळे एकूण ३.०९,७८८ हेक्टर क्षेत्रास अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभमिळणार आहे व सुमारे ४८,००० हेक्टर क्षेत्रास प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळणार आहे.




लवकरच या प्रकल्पास सर्व संविधानिक मान्यता घेवून प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्र व मध्यप्रदेश राज्यातील शेतकऱ्यांमध्ये अतिशय आनंदाचे वातावरण आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांचे वतीने देवेंद्र फडणवीस व मोहन यादव यांचे मनापासून आभार व्यक्त करतो असे महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार गिरीश महाजन यांनी नमूद केले आहे आहे.

**शेतकऱ्यांच्या जीवनात मोठी क्रांती होईल - देवेंद्र फडणवीस**

आजच्या करारामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात मोठी क्रांती होईल आणि अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल. केंद्रीय योजना म्हणून याचा स्वीकार व्हावा, अशी विनंष्टी आता आम्ही दोन्ही मुख्यमंत्री मिळून केंद्र सरकारकडे पुन्हा करणार आहोत. या बैठकीत महाराष्ट्राचे मुद्दे सुद्धा आम्ही मांडले. त्यात डांगुर्ली बॅरेज, जामघाट असे महत्त्वाचे मुद्दे होते.

या जामघाट प्रकल्पासाठी २८ वर्षांपूर्वी मी मध्यप्रदेशात तत्कालिन मुख्यमंत्र्यांसोबत आलो होतो. पण, आता त्यालाही गती मिळते आहे, याचा आनंद आहे. या जामघाटमुळे नागपूर शहरासाठी पुढच्या ३० ते ४० वर्षांसाठी पाणी मिळणार आहे. आता ऑक्टोबरमध्ये पुढची बैठक घेण्यात येईल. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश कोणत्या क्षेत्रात एकत्रित काम करु शकते, यादृष्टीने सुद्धा अनेक बाबींवर यावेळी चर्चा झाल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# ६० हजार अनधिकृत बससेमधून शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक

## परिवहनमंत्री सरनाईक यांच्या बैठकीत धक्कादायक माहिती

**मुंबई** - राज्यात सध्या अधिकृतपणे ४० हजार स्कूल बसेस रस्त्यावर धावत असून दुसरीकडे सुमारे ५० ते ६० हजार बसेस अनधिकृतपणे धोकादायक पद्धतीने शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करीत असल्याची धक्कादायक माहिती गुरुवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आयोजित केलेल्या बैठकीत समोर आली. शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या चालक-मालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यानी याबाबत तक्रार केली आहे. या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला प्राधान्य देत लवकरच स्कूल बसेसच्या नियमावलीत सुधारणा करणार असल्याचे प्रताप सरनाईक यांनी जाहीर केले. तसेच शालेय विद्यार्थ्यांची अनधिकृतपणे वाहतूक करणाऱ्या बसेसवर कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज यशवंतराव चव्हाण सभागृह येथे स्कूल बस असोसिएशन



आणि पालक असोसिएशन यांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. या बैठकीत बोलताना सरनाईक यांनी, स्कूल बसमधून शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुखावह झाला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या जीविताशी कोणीही खेळू नये. त्यांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

अनधिकृतपणे विद्यार्थ्यांची ने-आण करताना कारवाई केलेल्या स्कूल बसेसना पुढील तीन महिन्यांत दंडात्मक रकम भरून त्या बसेस अधिकृत करून घेण्याची संधी सरनाईक यांनी बस मालकांना या बैठकीत दिली. मात्र, ३ महिन्यानंतर ज्या प्रादेशिक परिवहन विभागांमध्ये अशा प्रकारच्या अनधिकृत स्कूल बसेस आढळल्यास संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनाही कठोर कारवाईला समोर जावे लागणार असल्याचे प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.

परिवहन विभागानेही विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला प्राधान्य दिले असून यासाठी स्कूल बसेसच्या नियमावलीत आवश्यक सुधारणा केल्या जातील. वाहन चालकांनी या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, नियमावलीत सुधारणा करताना वाहनचालक आणि पालक संघटनांच्या भावना आणि अडचणींचाही विचार केला जाईल. कोणावर अन्याय होणार नाही. पण नियमही शिथिल होणार नाहीत, असे सरनाईक यावेळी म्हणाले. या बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

तर स्कूल बस धोरण करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. या धोरणातील त्रुटी दूर केल्या जातील. आजच्या बैठकीत स्कूल बस असोसिएशन आणि पालक असोसिएशन यांनी मांडलेल्या सूचनांचा धोरणातील नियम सुधारणावेळी विचार केला जाईल, असे आश्वासन परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी यावेळी दिले. बैठकीला परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच असोसिएशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.



# १५ मे नंतरच शेतकऱ्यांना मिळणार कपाशीचे बियाणे

## हंगामपूर्व लागवड रोखण्यासाठी कृषी विभागाची उपाययोजना



**अहिल्यानगर** : कापूस पिकावरील सेंद्रिय बोंडआळीचा बंदोबस्त करण्यासाठी १ जूननंतर कपाशी लागवड सुरू होईल, यादृष्टीने कृषी विभागाने नियोजन केले आहे. याचाच भाग म्हणून शेतकऱ्यांना १५ मेपासून कपाशी बियाणे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले. सेंद्रीय बोंड अळीचा बंदोबस्त करण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने ही उपाययोजना करण्यात येणार आहे.

राज्यात खरीप २०१७ च्या हंगामापासून कपाशी पिकावर सेंद्रिय बॉड आळीचा प्रादूर्भाव दिसत आहे. यासाठी कृषी विभागाने २०१८ ते २०२४ या कालावधीत राबवलेल्या विविध उपयोजनांमुळे या अळीचा प्रादुर्भाव कमी झाला. मात्र, २०२५ च्या हंगामात या अळीचा पुन्हा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी क्षेत्रीय पातळीवर आत्तापासून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. कापूस शास्त्रज्ञांच्या मतानुसार सेंद्रिय बोंड आळीचा जीवनक्रम खंडित न झाल्याने प्रादूर्भाव वाढत असल्याचे दिसून येत आहे. हंगाम पूर्व कापूस लागवड झाल्यास शेंद्री बोंडअळीच्या जीवनक्रमास पोषक वातावरण निर्माण होऊन प्रादुर्भाव वाढण्यास धोका शक्यता अधिक आहे. ही बाब लक्षात घेऊन अनेक उपाययोजनांपैकी एक म्हणून हंगाम पूर्व कापसाची लागवड होणार नाही, यादृष्टीने कृषी विभागाच्यावतीने उपाययोजना करण्यात येत आहेत. कृषी विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने काटेकोर नियोजन करत अंमलबजावणी करावी, असे आदेश कृषी संचालक यांनी जिल्हास्तरावरील कृषी विभागाला दिले आहेत.

यंदाच्या खरीप हंगामातत बीटी कापूस बियाणे पुरवठा कंपन्यांनी १ ते १० मे या दरम्यान कपाशी बियाण्याचे मुख्य वितरकांना उपलब्ध करून द्यावे. १० मे नंतर मुख्य वितरकांनी कपाशी बियाणे किरकोळ विक्रेत्यांना पाठवावेत. यानंतर प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कपाशी बियाणे १५ मे पासून उपलब्ध होणार आहे. त्यानंतर १ जूनपासून कपाशी लागवड सुरू होईल, याकडे लक्ष देण्याच्या सुचना राज्य पातळीवरून जिल्हा पातळीवरील कृषी विभागाला देण्यात आल्या आहेत.

# यंदा बारावीचा निकाल ९१.८८ टक्के

**अहिल्यानगर** : माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यंदा मे महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात बारावीचा निकाल जाहीर झाला आहे. बारावीच्या परीक्षेत ९१.८८ टक्के नियमित विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कोकण विभागाचा निकाल ९३.७४ टक्के असा सर्वाधिक असून, सर्वांत कमी निकाल लातूर विभागाचा ८९.४६ टक्के इतका आहे.

अहिल्यानगर जिल्यातील १२ वीचा निकाल ८६.३४ टक्के लागला. अकोले ८८.४२ टक्के, जामखेड ९४.८९ टक्के, कर्जत ८७.१५ टक्के, कोपरगाव ८८.२२ टक्के, नगर ८५.९३ टक्के, नेवासा ७७.३१ टक्के, पारनेर ८६.२१ टक्के, पाथर्डी ८२.२९ टक्के, राहाता ८९.८२ टक्के, राहुरी ८६.५५ टक्के, संगमनेर ९३.७० टक्के, शेवगाव ७६.६३ टक्के, श्रीगोंदा ८८.५९ टक्के आणि श्रीरामपूर ८५.५१ टक्के असा एकूण ८६.३४ टक्के आहे.

# न्यायमूर्तींची संपत्ती जाहीर

**नवी दिल्ली** : सरन्यायाधीशांसह सर्वोच्च न्यायालयातील ३३ पैकी २१ न्यायमूर्तींनी आपली संपत्ती जाहीर केली आहे. यात नियोजित सरन्यायाधीशांसह कॉलेजियमच्या सदस्य न्यायाधीशांचाही समावेश आहे. अन्य १२ न्यायमूर्तींची संपत्ती लवकरच संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.



१ एप्रिल २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने हा निर्णय घेतला होता. भूषण गवई यांच्या निवृत्तीनंतर २४ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीश म्हणून नियुक्त होणारे न्या. सूर्यकांत यांच्या संपत्तीची माहितीदेखील संकेतस्थळावर आहे.

# साखरेची एमएसपी वाढली नाही तर उद्योग डबघाईला येण्याची तज्ञांना भिती

**पुणे** : केंद्र सरकारने उसाच्या एफआरपीमध्ये टनास १५० रुपये दरवाढ केली. त्यामुळे ऊस उत्पादकांना दिलासा मिळाला. मात्र केंद्राने एफआरपीबरोबर साखरेचे किमान विक्री दर (एमएसपी) वाढीबाबत कोणताच निर्णय न घेतल्याने साखर उद्योगाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. यंदा अनेक कारखान्यांनी एफआरपी देणे बंधनकारक असल्याने बँकाकडून कर्जे काढून एफआरपीची रक्कम दिली आहे. हा बोजा असतानाच आता एकतर्फी निर्णय घेऊन केंद्राने साखर उद्योगच धोक्यात आणला असल्याचा आरोप कारखानदारांच्या संघटनांनी केला आहे. केंद्राने साखरेची एमएसपी जाहीर केल्यापासून तब्बल सहा वेळा एफआरपीत वाढ केली, पण एमएसपीवाढीचा एकदाही निर्णय घेतला नाही हा दुटप्पीपणा असल्याची टीका कारखानदारांनी केली.

साखर संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील म्हणाले की, एफआरपी वाढवताना साखरेच्या किमतीही वाढवाव्यात असा कायदा आहे. पण केंद्र याकडे दुर्लक्ष करत आहे. योग्य ऊसदर वेळोवेळी मिळायला हवा, अशी साखर संघाची भूमिका आहे. त्याचबरोबर वाढवलेली एफआरपी शेतकऱ्यांन मिळवून देण्यासाठी कारखान्यांकडे पैसादेखील यायला हवा. तर साखर उद्योगातील तज्ज्ञ पी. जी. मेढे म्हणाले की, सध्या साखरेच्या किमतीत अनिश्चितता आहे. कारखान्यांनी इथेनॉल व अन्य उपपदार्थातून येणारी रक्कम कशी तरी गोळा करून एफआरपी दिली. अनेकांनी कर्जे काढून एफआरपीची रक्कम भागविली. आता केंद्राच्या या एकतर्फी निर्णयामुळे कारखानदारांचे कंबरडे मोडणार आहे.

# पुस्तकांशिवाय मेंदूला चालना मिळत नाही : सरोदे

**नेवासाफाटा** : आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण पुस्तकाला हात लावीत नाही कारण आपण सर्व मोबाईलच्या अधिन झालो आहोत. खरंतर वाचन संस्कृती हा फार मोठा विषय आहे. पुस्तक वाचाल तर मस्तक ठीक होईल, असे उद्गार पिचडगावचे माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप सरोदे यांनी काढले.

शब्दगंध साहित्यिक परिषद नेवासा शाखेने आयोजित केलेल्या फिरते मोफत वाचनालय उपक्रमात ते बोलत होते.

याप्रसंगी ग्रामस्थांना पुस्तक वाचनाचे महत्त्व विषद करताना ते म्हणाले, जोपर्यंत आपण पुस्तक हातात घेत नाही तोपर्यंत मेंदूला चालना मिळत नाही आणि म्हणूनच तुमच्या हातात पुस्तक आणून देण्याचे काम शब्दगंध साहित्यिक परिषदेची नेवासा शाखा करीत असून त्याबद्दल शब्दगंधला धन्यवाद दिले पाहिजेत. शब्दगंधच्या सर्व सदस्यांचे



विशेषतः डॉ. अशोकराव ढगे, नेवासा तालुका शाखेचे अध्यक्ष प्रा. डॉ. किशोर धनवटे, दिगंबर गोंधळी, प्रा. डॉ. दिगंबर सोनवणे यांचे त्यांनी आभार मानले.

नेवासा शाखेचे उपाध्यक्ष दिगंबर गोंधळी यांनी संबळ वाद्य वाजवून वातावरण निर्मिती केली. कृषीशास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी फिरते मोफत वाचनालय उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. दुसरे सल्लागार प्रा. डॉ. दिगंबर सोनवणे यांनी पुस्तक वाचण्याचे महत्त्व व मोबाईलच्या वाढत्या वापराचे दुष्परिणाम स्पष्ट करून यावर पुस्तक वाचन हाच एकमेव पर्याय असल्याचे सांगून विविध पुस्तके वाचण्यास घेण्याचे अवाहन केले. यावेळी राजेंद्र गि-हे, सीताराम गव्हाणे, लहानू गव्हाणे, जगदीश शेजुळ, शशिकांत बनसोडे, शंकर गव्हाणे, छबुराव माळी, साहेबराव गव्हाणे, काशिनाथ गव्हाणे, दिलीप नवघरे, साखरबाई बनसोडे. अशोक मकासरे, गणेश टिळेकर, संदीप गि-हे. दत्तात्रय हजारे, गौतम बनसोडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# ‘जातवैधता’साठी तीन महिने मुदतवाढ

**अहिल्यानगर** : अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांना शासनाने मोठा दिलासा दिला असून, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (एसईबीसी) आणि इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गातून व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचा शासन निर्णय जाहीर केला आहे.

पूर्वी राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ दिली होती. त्यानंतरही काही विद्यार्थी प्रमाणपत्र सादर करू शकले नाहीत. त्यासाठी पुन्हा मुदतवाढ मिळावी, अशी मागणी पालक आणि विद्यार्थ्यांनी केली होती. त्यामुळे जानेवारीमध्ये पुन्हा तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. मात्र, त्यानंतरही काही विद्यार्थ्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागाने आता आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ देत विद्यार्थ्यांना दिलासा दिला आहे.

परिपत्रकानुसार २ मे, २०२५ पासून पुढील तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. प्रमाणपत्र अद्याप सादर न केलेल्या विद्यार्थ्यांनी मुदतीचा लाभ घेऊन प्रक्रिया तत्काळ पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.


# भारताने विकसित केली जगातील पहिली जीनोम संपादित भाताची वाण

**पुणे** : भारतीय कृषी संशोधन परिषदेने जीनोम एडिटिंग (संपादित) करून भाताच्या दोन नवीन जाती विकसित केल्या आहेत, ज्यांची विशेषता कमी खर्च, कमी पाणी आणि कमी वेळेत अधिक उत्पादन आहे. यामुळे ३० टक्क्यांपर्यंत भाताचे उत्पादन वाढेल आणि हवामान बदलाच्या आव्हानांना कमी करण्यास मदत मिळेल. पहिल्या वाणाचे नाव कमला (डीआरआर-१००) आहे आणि दुसऱ्याचे नाव डीएसटी राईस-१ आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी रविवारी हे जारी केले.

जीनोम संपादित भातापासून तांदळाच्या जाती विकसित करणारा भारत जगातील पहिला देश ठरला आहे. चौहान यांनी याला कृषी संशोधनाच्या क्षेत्रातील भारताची ऐतिहासिक उपलब्धी असल्याचे म्हटले आहे. या जाती देशात दुसरी हरितक्रांती घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. लवकरच त्या शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिल्या जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

छत्तीसगड, मध्य प्रदेश, ओडिशा, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश, बंगाल, आंध्र प्रदेश, तेलंगणा, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू आणि महाराष्ट्रातील कृषी परिस्थितीनुसार विकसित केल्या गेल्या आहेत.

या राज्यांमध्ये या जातींची शेती केल्याने सुमारे ४५ लाख टन अधिक



भाताचे उत्पादन होईल. ग्रीन हाऊस वायूंच्या उत्सर्जनात २० टक्के म्हणजेच ३२०० टनांची घट येईल. पीक तयार होण्यास २० दिवस कमी लागल्याने जवळपास तीन वेळा

सिंचन कमी लागेल. लवकर तयार झाल्याने पुढील पिकाची पेरणी वेळेवर होऊ शकेल.

कमला ही जीनोम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या भारतीय भात संशोधन संस्थेने (हैदराबाद) बारीक दाण्याची वाण सांबा महसुरी (बीपीटी ५२०४) पासून विकसित केली आहे. सुधारित बियाण्यात मूळ वाण सांबा महसुरीच्या तुलनेत दाण्यांची संख्या जास्त असेल. याला कमी सिंचनाची गरज भासेल आणि ते २० दिवस लवकर तयार होईल. चाचणीत कमलाची सरासरी उपज प्रति हेक्टर ५.३ टन आढळली आहे, जी सांबा महसुरीपेक्षा जवळपास २० टक्के अधिक आहे. अनुकूल परिस्थितीत ते ३० टक्क्यांपर्यंत वाढू शकते.

पूसा डीएसटी राईस-१: दक्षिण भारतासाठी वरदान दुसरी वाण पूसा डीएसटी राईस-१ आहे, जी खउठ (पूसा, नवी दिल्ली) ने विकसित केली आहे. याचा दाणा लांब आणि बारीक असेल. दक्षिण भारतातील रब्बी हंगामासाठी हे अत्यंत उपयुक्त आहे. ते आपल्या मूळ वाण एमटीयू १०१० च्या तुलनेत २० टक्के अधिक उपज देईल.

कमला वाणाच्या विकासासाठी डॉ. सत्येंद्र कुमार मंग्राउथिया, डॉ. आर. एम. सुंदरम, डॉ. आर. अब्दुल फियाज, डॉ. सी. एन. नीरजा आणि डॉ. एस. व्ही. साई प्रसाद तसेच पूसा डीएसटी राईससाठी डॉ. विश्वनाथन सी, डॉ. गोपाल कृष्णनन एस, डॉ. संतोष कुमार, डॉ. शिवानी नागर, डॉ. अर्चना वत्स, डॉ. रोहम रे, डॉ. अशोक कुमार सिंह, डॉ. प्राजल यादव, राकेश सेठ, ज्ञानेंद्र सिंह मोठे योगदान आहे.

### जीनोम तंत्रज्ञानाने तयार, हवामान बदलाशी लढण्यास मदतगार

देशात विकसित जगातील पहिल्या दोन जीनोम संपादित भाताच्या जातींचा विकास वैज्ञानिक संशोधनातील नवोन्मेषाची सुरुवात आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मूळ डीएनए मध्ये सूक्ष्म बदल करून पिकांची नवीन वाण तयार केली जाते. सामान्य पिकांमध्ये अशा बदलांना केंद्र सरकारच्या जैब सुरक्षा नियमांअंतर्गत मंजुरी प्राप्त आहे. भारतीय कृषी संशोधन परिषद २०१८ पासून दोन्ही जाती विकसित करण्यासाठी काम करत होते.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |

**नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक**

| | | |
|---|---|---|
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |

**चरित्र/आत्मचरित्र**

| | | |
|---|---|---|
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |

**कविता संग्रह**

| | | |
|---|---|---|
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |

**चरित्र**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

**सामान्यज्ञान**

| | | |
|---|---|---|
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |

**शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी**

| | | |
|---|---|---|
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**


CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD




Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 | +91 9822525444
Website : creatikmultiservices.com
Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# पालिका, झेडपी निवडणुकांचे बिगुल वाजणार

## सुप्रीमचे ४ महिन्यांत निवडणूक घेण्याचे आदेश ओबीसी आरक्षणही पूर्ववत

**मुंबई** : स्थानिक स्वराज्य संस्थांमधील इतर मागासवर्गाचे आरक्षण (ओबीसी), सदस्य संख्या, प्रभाग रचना आदी कारणांमुळे न्यायालयीन कचाट्यात अडकलेल्या राज्यातील महापालिका, नगरपालिका, नगर पंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीचा मार्ग मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने मोकळा झाला. गेल्या अडीच तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत चार आठवड्यांत निर्णय घ्या, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे दिवाळीनंतर स्थानिक निवडणुकीचा बार उडणार हे आता स्पष्ट झाले आहे.



सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला पुढील चार आठवड्यांत निवडणुकीची अधिसूचना जारी करण्याचे आणि त्यानंतर चार महिन्यांत निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर यासारख्या प्रमुख शहरांतील महानगरपालिका तसेच इतर नगरपालिकांच्या निवडणुकांना गती मिळणार आहे.

त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह राजकीय पक्षांचे डोळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे लागले आहे. न्यायालयाने निवडणुकांना हिरवा कंदील दाखवल्याने राज्यात लवकरच मिनी विधानसभा निवडणुकीचे वारे वाहणार आहेत.

**राज्यातील २२८ नगर परिषदा, २९ नगर** पंचायती, २६ जिल्हा परिषदा आणि २८९ पंचायत समित्यांची मुदत संपली आहे. मुदत संपल्याने या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये प्रशासक राजबट आहे.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एनके सिंह यांच्या खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला चार आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिसूचित करण्याचे निर्देश दिले. चार महिन्यांच्या आत निवडणूक

प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश खंडपीठाने दिले. बांठिया आयोगाला आव्हान देणाऱ्या याचिकांच्या निकालावर निवडणुका अवलंबून असतील आणि या आदेशामुळे पक्षांनी उपस्थित केलेल्या वादांबर कोणताही परिणाम होणार नाही, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

खंडपीठाने म्हटले की, तळागाळातील लोकशाहीच्या सवैधानिक आदेशाचा आदर केला पाहिजे आणि तो सुनिश्चित केला पाहिजे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने पपंचायत निवडणुकीतील ओबीसी आरक्षण प्रकरणावर सुनावणी घेताना हा महत्वाचा निर्णय दिला.

# अभिव्यक्ती स्वतंत्र्याच्या नावावर अपमानाची परवानगी नाही : कोर्ट

**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार हा निरपेक्ष नाही आणि या अधिकाराच्या नावाखाली कोणालाही कोणाचाही अपमान करण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही. अपंगांची खिल्ली उडवल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने इंडियाज



**दिव्यांगांची थट्टा केल्याने सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरला बोलावले**

गॉट लेटेंटचा होस्ट समय रैनासह पाच सोशल मीडिया इन्फ्लुएंसरना न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. जर ते हजर राहिले नाहीत तर त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा न्यायालयाने दिला.

सोमवारी एका स्वयंसेवी संस्थेने या प्रकरणी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू होती. खंडपीठाने या प्रभावकांचे वर्तन हानिकारक आणि निराशाजनक असल्याचे वर्णन केले. खंडपीठाने म्हटले की, हे प्रकरण अतिशय संवेदनशील आणि महत्त्वाचे आहे. अशा घटना रोखण्यासाठी गंभीर सुधारणात्मक आणि दंडात्मक कारवाई आवश्यक आहे.

न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले की, या आदेशानंतर बरेच लोक मूलभूत हक्कांच्या मुद्द्यावर लेख लिहिण्यास सुरुवात करतील, परंतु न्यायालयाला या मुद्द्यांना कसे हाताळायचे हे माहित आहे.

## महिलांसमोर श्रीलंकेचे तगडे आव्हान

**मुंबई** : : भारतीय महिला क्रिकेट संघ रविवारी तिरंगी एकदिवसीय मालिकेतील अंतिम फेरीत श्रीलंकेचा सामना करणार आहे. प्रत्येक विभागात शानदार कामगिरी करून विजेतेपद पटकावण्याचे भारताचे लक्ष्य असेल. या मालिकेत भारताचा एकमेव पराभव श्रीलंकेविरुद्ध झाला आहे.

# भारताची अर्थव्यवस्था यंदा जपानलाही मागे टाकणार

**वॉशिंग्टन** : आगामी काही वर्षात भारत जर्मनीलाही मागे टाकून जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या वर्ल्ड इकॉनॉमिक आउटलूक एप्रिल २०२५च्या ताज्या आवृत्तीनुसार भारत २०२५मध्ये जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनेल. भारताचा जीडीपी २०२५ मध्ये ४,१८७.०१७ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचेल, अशी अपेक्षा आहे. हा जपानच्या अंदाजित ४,१८६,४३१ अब्ज डॉलरच्या जीडीपीपेक्षा अधिक आहे.

सन २०२४पर्यंत भारत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होता. आगामी वर्षांमध्ये, भारत जर्मनीला मागे टाकून तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल. २०२८पर्यंत भारताचा जीडीपी ५,५८४.४७६ अब्ज डॉलर इतका असेल. हा जर्मनीच्या ५,२४१९२८ अब्ज डॉलरच्या जीडीपीपेक्षा अधिक आहे. सन २०२५मध्ये अमेरिका आणि चीन हे दोन देश जगातील टॉप दोन मोठ्या अर्थव्यवस्था म्हणून कायम राहतील. दोन्ही देश संपूर्ण दशकात आपले स्थान कायम टिकवून ठेवतील.

गेल्या ८० वर्षांपासून बहुतांश देश ज्या जागतिक आर्थिक प्रणालीवर चालत आहेत तिची पुनर्रचना होत आहेत. जग एका नव्या युगात प्रवेश करीत आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टेरिफबाबत घेतलेल्या निर्णयांमुळे व्यापारी तणाव आणि आगतिक अनिश्चितता वाढली आहे. त्यामुळे हा अंदाज खाली आला आहे. अहवालात म्हटले की, भारतासाठी, २०२५मध्ये वाढीचा दृष्टीकोन तुलनात्मकदृष्ट्या अधिक स्थिर ६.२ टक्के इतका आहे.

आयएमएफने २०२५साठी जोडीपी वाढीच्या दराचा अंदाज ६.२ टक्के इतका सांगितला. हा दर जानेवारीतील ६.५% या पूर्वीच्या अंदाजापेक्षा कमी आहे.

भारत २०२७मध्ये ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनेल. भारताचा जीडीपा ५,०६९.४७ अब्ज डॉलरच्या घरात पोहोचलेला असेल. भारताच्या जीडीपीच्या वाढीत उत्पादन क्षेत्र, शेती आणि संबंधित उद्योग, पायाभूत सुविधांचा विकास, सेवा क्षेत्र आणि एमएसएमई या क्षेत्रांचे योगदान महत्वाचे असेल.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हुशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

# आयपीएल १६ मेपासून पुन्हा सुरु होणार!




नवी दिल्ली : भारत-पाकिस्तानने युद्धबंदीची घोषणा केल्यानंतर काही तासांतच आयपीएल २०२५ चे उर्वरित सामने पूर्ण करण्याची चर्चा सुरू झाली. शुक्रवारी बीसीसीआयने आयपीएल आठवडाभर स्थगित करण्याची घोषणा केली होती.

बीसीसीआयच्या सूत्रानुसार, १५ किंवा १६ मेपर्यंत आयपीएल पुन्हा सुरू होऊ शकेल. बीसीसीआय आता उर्वरित वेळापत्रकात सुधारणा करेल. परिस्थिती सामान्य झाल्याने धर्मशाळा वगळता इतर सर्व ठिकाणी सामने खेळविता येतील.

**विदेशी खेळाडू परत येतील?**

बीसीसीआयला विदेशी खेळाडूंच्या उपलब्धतेचा प्रश्न भेडसावू शकतो. १ मे रोजी आयपीएल आठवड्यासाठी स्थगित केल्यानंतर लगेचच, खेळाडू, समालोचक आणि सपोर्ट स्टाफसह सर्वजण आपापल्या घरी निघून गेले.

युद्धबंदी झाली तरी काही खेळाडू अजूनही परतण्याबाबत घाबरत असतील. विदेशी खेळाडू घाबरले होते. आंतरराष्ट्रीय विमानतळ बंद होण्याच्या भीतीमुळेच त्यांच्यात घबराट निर्माण झाली होती, असे एका सूत्राने सांगितले. विदेशी क्रिकेटपटू भारतात परत येतील, असा विश्वास आयपीएल चेअरमन अरुण धुमल यांना आहे.

ते म्हणाले की, विदेशी खेळाडूंना भारतात परतण्यास कोणतीही अडचण येणार नाही. अशा तणावपूर्ण परिस्थितीत विदेशी क्रिकेटपटूंचे मायदेशी परत जाणे स्वाभाविक होते. परंतु आता परिस्थिती सामान्य झाली आहे. मला खात्री आहे की विदेशी खेळाडू परत येऊन स्पर्धेत सहभागी होऊ इच्छितात. आम्ही परिस्थितीचा आढावा घेऊ आणि त्यानुसार संघ मालकांसह सर्व भागधारकांना माहिती देणार आहोत.

**विराटचेही निवृत्तीचे सूतोवाच**

रोहितच्या निवृत्तीच्या तीनच दिवसांनंतर विराट कोहलीनेसुद्धा कसोटी क्रिकेटला रामराम ठोकण्याची इच्छा व्यक्त केली. यावर अजून अधिकृत घोषणा झाली नसली तरी शंकाचा धूर निर्माण झाला आहे. असे पण असू शकते की विराट आणि बीसीसीआय यांच्यात काही बोलणे सुरू असेल. कारण ही बातमी बीसीसीआयकडून फुटली आहे. टीमच्या नेतृत्वाबाबत किंवा विराटच्या कसोटीतील कामगिरीवरून काहीतरी दबाव राहण्याची शक्यता आहे.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, फ्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021